**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी छत्तीसगडच्या दौऱ्यावर / १४ हजारपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास कामांचं केलं लोकार्पण आणि पायाभरणी

- देशातली ७ राज्य आणि २ केंद्रशासित प्रदेशांच्या स्थापनादिनानिमित्त आज विशेष कार्यक्रम

- देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत घट

- ‘लखनौ’ शहराचा युनेस्कोच्या सर्जनशील शहरांच्या यादीत समावेश

**आणि**

- आशियाई युवा क्रीडास्पर्धांमध्ये भारताची ४८ पदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज छत्तीसगडमध्ये १४ हजार २६० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. नवा रायपूर अटलनगर इथं छत्तीसगड विधानसभेच्या नव्या इमारतीचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. हरित इमारत संकल्पनेवर बांधलेली ही रचना सौरऊर्जेवर चालण्यासाठी तयार केली असून या ठिकाणी पावसाचं पाणी साठवण्याच्या व्यवस्थेचाही समावेश आहे.

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरणही मोदी यांनी केलं.

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय तसंच लोकसभेचे सभापती ओम बिरला कार्यक्रमला उपस्थित आहेत.

नवा रायपूर इथं प्रधानमंत्र्यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या शांतिशिखराचं उद्घाटन केलं. श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयाला भेट दिली तसंच दिल की बात कार्यक्रमाद्वारे सुमारे अडीच हजार बालरुग्णांशी संवाद साधला.

**<><><><><>**

देशातली ७ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेश आज आपला स्थापना दिवस साजरा करत आहेत. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, आणि पंजाब ही राज्य तसंच लक्षद्वीप, आणि पुदुच्चेरी हे केंद्रशासित प्रदेश १ नोव्हेंबर रोजी स्थापन झाले. राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिथल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व राज्यांनी देशाच्या प्रगतीत उल्लेखनीय योगदान दिलं असून, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विकास यात्रेत सातत्यानं नवे विक्रम प्रस्थापित व्हावेत, अशी इच्छा राष्ट्रपतींनी व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हरयाणा मधल्या शेतकरी बंधुभगिनींनी आपल्या अविरत परिश्रमांमधून आणि शूर सैनिकांनी आपल्या राष्ट्रभक्तीतून देशासमोर एक आदर्श निर्माण केला आहे, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. केरळचं निसर्ग सौंदर्य आणि वारसा भारताच्या सांस्कृतिक वैभवाचं प्रतीक आहे, कर्नाटक हे राज्य ज्ञानात रुजलेल्या प्रगतीचं प्रतीक असून या राज्यानं नेहमीच कला, साहित्य, संगीत आणि उद्योगप्रधान संस्कृती जोपासली आहे, तर देशाच्या हृदयात वसलेलं मध्यप्रदेश हे राज्य प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला आहे.

या सर्व ठिकाणी राज्यस्थापनेचे कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. पहिल्या टप्प्यातलं मतदान ६ नोव्हेंबर रोजी होणार असून मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सर्व पक्षांचे उमेदवार करत आहेत. या पार्श्वभूमीवर रालोआ आणि महाआघाडीचे नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत.

बिहारमधे रालोआची लाट असून यावेळीही राज्यात राओलाचंच सरकार स्थापन होईल, असा विश्वास लोकजनशक्ती पार्टी रामविलासचे प्रमुख चिराग पासवान यांनी व्यक्त केला. तर महाआघाडी गुन्हेगारांना पाठिंबा देत असल्याचा आरोप भाजपा खासदार मनोज तिवारी यानी केला.

दुसरीकडे बिहारची जनता आपल्याला भरघोस पाठिंबा देत असून जनता महाआघाडीचं सरकार स्थापन करेल असा विश्वास भाकप महासचिव डी राजा यांनी व्यक्त केला.

<><><><><>

देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत आजपासून घट झाली आहे. घरगुती वापराच्या १४ किलो २०० ग्रॅम वजनाच्या एल पी जी सिलेंडरच्या  किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत साडे चार ते साडे सहा रुपयांपर्यंत घट झाली असून यानुसार आता दिल्लीत या  सिलेंडरची किंमत १ हजार ५९० रुपये ५० पैसे असेल,  मुंबईत हा सिलेंडर १ हजार ५४२ रुपयांना मिळेल. कोलकाता इथं सर्वाधिक साडे सहा रुपयांची घट झाली असून तिथं सिलेंडरची किंमत १ हजार ६९४ रुपये तर चेन्नई मध्ये १ हजार ७५० रुपये असेल.

<><><><><>

भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्रातल्या प्रादेशिक कार्यालयानं ऑगस्ट महिन्याच्या  पहिल्या आठवड्यापासून ‘खुला बाजार विक्री योजने’ अंतर्गत तांदळाची विक्री सुरू केली आहे. तांदळाचा साठा खरेदी करण्यासाठी खरेदीदारांनी अन्न महामंडळाचा  ई-लिलाव सेवा प्रदाता, असलेल्या एम-जंक्शन सर्व्हिसेस लिमिटेडकडे स्वतःची नोंदणी करावी आणि उपलब्ध साठ्यासाठी बोली लावावी, असं याबाबतच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

समृद्ध आणि वैविध्यपूर्ण खाद्य संस्कृतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ‘लखनौ’ शहराचा युनेस्कोच्या सर्जनशील शहरांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. उझबेकिस्तानमध्ये समरकंद इथं झालेल्या ४३ व्या सर्वसाधारण बैठकीत युनेस्कोनं लखनौ शहराला ‘गॅस्ट्रोनॉमीच्या श्रेणीत मान्यता दिली. यामुळे लखनौला जगभरातल्या ७० गॅस्ट्रोनॉमी शहरांमध्ये स्थान मिळालं असून, हैदराबादनंतर हा किताब मिळवणारं भारतातलं हे दुसरं शहर ठरलं आहे.

<><><><><>

पाकिस्ताननं पाक-व्याप्त काश्मीरमधली दडपशाही ताबडतोब थांबवावी असा कडक इशारा भारतानं दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत, भारताच्या संयुक्त राष्ट्र मिशनच्या प्रथम सचिव भाविका मंगलनंदन बोलत होत्या. पाकिस्ताननं बेकायदेशीरपणे बळकावलेल्या भारताच्या भूभागातलं मानवी हक्काचं उल्लंघन थांबवावं असं आवाहन त्यांनी केलं. जम्मू-

काश्मीर आणि लडाख हे केंद्रशासित प्रदेश भारताचा अविभाज्य भाग असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसा आणि त्यासाठी १ लाख अमेरिकी डॉलर्स शुल्क लागू करण्याच्या आपल्या घोषणेचा पुनर्विचार करावा अशी विनंती अमेरिकेतल्या लोकप्रतिनिधींनी केली आहे. माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या अमेरिकेच्या यशामागे भारतीय नागरिकांची मोठी भूमिका असून, या निर्णयामुळे भारत-अमेरिका संबंधांवर नकारात्मक परिणाम होईल असं त्यांनी ट्रम्प यांना लिहिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

अमेरिकेतल्या अनेक आघाडीच्या कंपन्या एच-१बी धारक व्यक्तींनी स्थापन केल्या आहेत अथवा त्यांचं नेतृत्व केलं आहे. तसंच ते नवीन व्यवसाय सुरु करून, रोजगार निर्मिती करतात आणि अमेरिकेला तंत्रज्ञानाच्या प्रगतीत आघाडीवर ठेवतात, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

बहरीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई युवा क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ४८ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये १३ सुवर्ण, १८ रौप्य आणि १७ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत भारताच्या २२२ खेळाडूंनी भाग घेतला होता. भारताच्या महिला संघानं कबड्डीमध्ये सुवर्णपदक पटकावलं, प्रीतीस्मिता भोई हिनं भारोत्तोलनात ४४ किलो वजनी गटात विक्रम प्रस्थापित करुन पहिलं वैयक्तिक सुवर्णपदक पटकावलं, तर मुष्टियुद्ध आणि बीच रेसलिंग प्रकारात खेळाडूंनी केलेली कामगिरी लक्षणीय ठरली.

**<><><><><>**

जर्मनीत सुरू असलेल्या हायलो ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या उन्नती हुड्डा नं महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत तिने चिनी तैपेईची लिन हसियांग-ती हिचा २२-२०, २१-१३ असा पराभव केला. आता उपांत्य फेरीत तिचा सामना अव्वल मानांकित इंडोनेशियच्या कुसुमा वर्दानीशी होईल. उन्नती ही उपांत्य पोहोचलेली एकमेव भारतीय बॅडमिंटनपटू आहे**.**

**<><><><><>**

आय सी सी महिला विश्वचषक स्पर्धेत भारताची अंतिम लढत दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. हा सामना नवी मुंबईच्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. उद्या सकाळी साडेनऊ वाजता खेळ सुरु होईल.

**<><><><><>**

भारताचे माजी हॉकी गोलरक्षक मॅन्युएल फ्रेडरिक यांचं आज वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झालं. केरळच्या कन्नूर इथले रहिवासी असलेले फ्रेडरिक यांनी १९७२ म्युनिक ऑलिम्पिक मध्ये कांस्य पदक पटकावलं होतं. आपल्या धाडसी गोलरक्षणाबद्दल परिचित असलेल्या फ्रेडरिक यांनी १९७१ ते १९७८ दोन विश्वचषकांमध्ये सहभाग घेतला. २०१९ मध्ये यांना ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

देशभरात आता हिवाळ्याची चाहूल लागत असून हिमाचल प्रदेशात रात्रीचं तापमान खाली आलं असून येत्या मंगळवार बुधवारी हिमवर्षावाची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरावरच्या कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव कमी होत आहे. येत्या मंगळवारपासून पाऊस ओसरेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

अंदमान आणि निकोबार द्वीप समूह, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, आणि बिहारमध्ये आज जोरदार पावसाची शक्यता असून, उत्तर कोकण किनारपट्टी, पूर्व-मध्य आणि ईशान्य अरबी समुद्राचा काही भाग आणि अंदमानच्या समुद्रात आज वादळी वातावरण राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**